International Journal of Advances in Engineering and Management (IJAEM)
Volume 3, Issue 2 Feb 2021, pp: 16-19 www.ijaem.net ISSN: 2395-5252

# सम्राट अशोकाची राज्यव्यवस्था

डॉ. लोकेशकुमार एच. नंदेश्वर
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला वाणिज्य*
*वविज्ञान महाविद्यालय ब्रम्हपुरी*

Submitted: 25-01-2021 Revised: 05-02-2021 Accepted: 10-02-2021

**सारांश (Abstract):—** सम्राट अशोकाची राज्यव्यवस्था या संशोधन पेपर मध्ये सम्राट अशोककालीन राज्यव्यवस्थेचा अभ्यास करण्यात आला आहे. सर्वांना प्रिय असणारा सम्राट अशोक हा राज्यव्यवस्थेत कसा निपुण होता, हे जाणुन घेण्याचा प्रयत्न ह्यात करण्यात आला आहे. बिंदूसाराने चंद्रगुप्ताने घालून दिलेली प्रशासनव्यवस्था बऱ्यापैकी सांभाळल्यामूळे फार काही बदल घडून आले नाहीत. बिंदूसाराच्या मृत्युनंतर गादीवर आलेला त्याचा पुत्र सम्राट अशोक याने राज्यकारभार सांभाळला मौर्य राजवटील कौटील्यानी वर्णन केल्याप्रमाणे प्रजेच्या हिताला प्राध्यान्य दिले जात होते.सम्राट अशोक महान विजेता, सफल शासक व कुशल संघटन कर्ता व दुरदर्शी सम्राट होता,या अतिरिक्त प्रतिभा संपन्नता , व दक्षता इत्यादी सारे गुण त्याच्यात होते आदर्श राज्य व्यवस्था केवळ कागदावर असून चालत नाही,तर राज्यकर्त्यांनी ते आदर्श प्रत्यक्ष आचरणात आणणे गरजेचे आहे. ते स्वयंम अशोकाने केले होते.

**महत्वाचे शब्द (Key Words):—**सम्राट अशोक, मौर्य साम्राज्य, कुशल संघटक, प्रजा, देवनाम प्रिय प्रियदर्शी

भारताच्या प्राचीन इतिहासातील सर्वात मोठे साम्राज्य म्हणून मौर्य साम्राज्याचा उल्लेख करावा लागेल. चंद्रगुप्त मौर्याने मौर्य सत्तेचा पाया घातला आणि आपल्या कारकीर्दीत आपल्या साम्राज्याचा विस्तार अफगाणिस्तानापासून ते दक्षिणेत थेट कावेरी नदी व पूर्वेकडील बंगालपर्यत विस्तार केला. एवढया मोठया राज्यविस्ताराची नीट घडी बसविण्यासाठी चंद्रगुप्ताने सुसंघटित अशी प्रशासनव्यवस्था उभारली या प्रशासनव्यवस्थेचा आदर्श मौर्यानंतर आलेल्या अनेक राजवटींनी स्विकारला. चंद्रगुप्तानंतर त्याचा पुत्र बिंदुसार इ.स.पू. २९८ मध्ये मौर्य साम्राज्याचा अधिपती झाला. त्याने साम्राज्यात नवीन प्रदेशाची भर घातली नसली तरी मूळ साम्राज्यात विघटन होऊ न देता व्यवस्थितपणे सांभाळले. बिंदूसाराने चंद्रगुप्ताने घालून दिलेली प्रशासनव्यवस्था बऱ्यापैकी सांभाळल्यामूळे फार काही बदल घडून आले नाहीत. बिंदूसाराच्या मृत्युनंतर गादीवर आलेला त्याचा पुत्र सम्राट अशोक याने राज्यकारभार सांभाळला मौर्य राजवटील कौटील्यानी वर्णन केल्याप्रमाणे प्रजेच्या हिताला प्राध्यान्य दिले जात होते.

'प्रजासुखे सुखं राज्ञः, प्रजाना च हिते हितम।
नात्मप्रिय राज्ञः, प्रजाना तु प्रिय हितम्।।

—(कौटिलीय अर्थषास्त्र—१—१९)

प्रजेचे सुख तेच राजाचे सुख, प्रजेचे हित तेच राजाचे हित, स्वत:ला प्रिय असे राजाचे हित नाही, प्रजेचा प्रिय तेच राजाला प्रिय

प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये सम्राट अशोकाचे स्थान अनेक अर्थांनी महत्वपूर्ण आहे. बिंदुसाराच्या मृत्युनंतर इ. स.पू. २७३ मध्ये सम्राट अशोक सत्तेवर आला. गादीवर येताच सम्राट अशोकाने चंद्रगुप्ताप्रमाणेच साम्राज्यविस्ताराचे धोरण अवलंबिले सुशीम, अशोक व तिश्य हे तीन भाऊ होते. यामध्ये अशोक हा प्रतिभावान, महत्वाकांक्षी, शस्त्र शास्त्रात निपूण होता. तक्षषिलेचे बंड मोडून त्याने आपले पराक्रम सिध्द केले.राजपदावरून वारसा संघर्ष सुरू होता. यात अशोकाचा विजय झाला. साम्राज्य सुस्थिर करून इ.स.पू. २६९ मध्ये अशोकाने अधिकृत राज्यभिषेक करून घेतला त्यावेळी त्याने स्वत:ला 'देवनाम प्रिय प्रियदर्शी' असे बिरूद धारण केले. अशोकाने चंद्रगुप्ताच्या प्रशासनव्यवस्थेला धर्मविभाग जोडला एवढाच बदल घडवून आणला चंद्रगुप्ताने स्थापन केलेला मौर्य साम्राज्याच्या लोकप्रियतेचा कळस सम्राट अशोकाचा कार्यकाळात गाढल्या गेला असे म्हणावे लागेल.

**मौर्यकालीनअशोकाची राज्यव्यवस्था**

मगधासारखा छोटयाष्या राज्याचे मोठया साम्राज्यात रूपांतर झाले. सम्राट अशोकाने यामध्ये काश्मिर जिंकूण विस्तार केला ऐवढया मोठया साम्राज्याची प्रशासनव्यवस्था सुध्दा व्यवस्थितपणे सांभाळल्या जात होती. सम्राट अशोकाने यामध्ये स्वत: काही प्रमाणात फेरबदल केलेत. परराष्ट्र धोरणात बदल केला. या प्रशासनाच्या आधारे साम्राज्याची घटी नीट बसवली.

अशोकाच्या काळातील राज्यव्यवस्थेबाबत सांगावयाचे झाल्यास त्याने बौध्द धर्माचे प्रसाराचे कार्य जोरात सुरू केले. सुध्दा राज्यव्यवस्थेकडे त्याने दुर्लक्ष केले नाही. साम्राज्यात कुठेही बंड होणार नाही, शांतता कायम राहील त्याची तो दक्षता घेत असे. म्हणूनच त्याचे राज्य शक्तीशाली व त्याचबरोबर लोककल्याणकारी होते. मौर्य साम्राज्य विशाल असल्यामुळे राज्यकारभाराच्या सोयीसाठी त्याचे ६ प्रातांत विभाजन करण्यात आले. प्रत्येक प्रांतात प्रमुख अधिकारी म्हणून एक राजप्रतिनिधी होता. सम्राटाच्या सत्ता देण्यासाठी मंत्रीपद होता. साम्राज्याची एकछत्री सत्ता सम्राटाची हाती केंद्रीत झालेली होती. वेगवेगळया खात्यांच्या प्रमुखाला महामात्र म्हणत राज्यातील महत्वाच्या घटनांनी माहीती राजाला देण्यासाठी गुप्तहेर (प्रतिवेदक) होते. अधिकाऱ्यानी आपल्या प्रातांत फिरून जनतेच्या अडचणी सोडवाव्यात, त्यांच्या तक्रारींचे निवारण करावे अशी अशोकाची आज्ञा होती. प्रजेच्या गाऱ्हाण्यांची दाद घेण्यास सदैव तत्पर असे. आपले अधिकारी लोकहितस्तव, उत्साही, प्रामाणिक व कार्यक्षम असावेत हयाची तो दक्षता घेत असे.

सम्राट अशोकाचे साम्राज्य अत्यंत विस्तृत असल्यामुळे त्याने आपल्या साम्राज्याचे विकेंद्रीकरण केले होते. काही प्रदेश तर असे होते की, तीथे सम्राट अशोकाने आंतरिक स्वातंत्र्यता बहाल केली होती. (प्रियदर्शी अशोक प्रबंधात्मक कृती, डॉ. रामशंकर मिश्र, विश्वभारती प्रकाशन नागपुर, २०१० पेज क्र. २५)

सम्राट अशोकाची राज्यव्यस्था जवळपास चंद्रगुप्ताच्या राज्यव्यस्थेसारखीच होती. ती उत्कृष्ट व आदर्श राज्यव्यवस्था असल्याने तिथे विशेष बदल करण्याची गरज अशोकाला वाटली नाही.सम्राट अशोकाने केवळ काही अधिकाऱ्याच्या नावांमध्ये बदल केला.तर काही नविन पद भरुन त्या राज्यव्यस्थेला अधिक बळकट व आदर्श बनविण्याचा प्रयत्न केला.या नविन पदामध्ये 'धर्ममहामात्र',स्त्रियात काम करणारी 'स्त्रिअध्यक्ष महामात्र',जंगली भागात राहणाऱ्या लोकवस्ती करीता काम करणारा तो 'वनभुमिक' आणि सिमांत प्रदेशाकडे लक्ष देणारा 'अन्तमहामात्र' अशा काही पदाचा उल्लेख करता येईल..

मौर्य शासनाचे स्वरूप कल्याणकारी हुकूमशाहीचे होते म्हणजे राजाची सत्ता जनतेच्या कल्याणाकरीता वापरल्या जात होती. मेगॅस्थनिज म्हणतो राजा जनतेची समस्या ऐकुन घेण्याकरीता सदैव तयार राहत असे. मौर्य प्रशासनतीन भागात विभाजित होते.

**१. मध्यवर्ती शासन २.प्रांतिय शासन ३.स्थानिय शासन**

**१. मध्यवर्ती शासन**

अ) सार्वभौम राजा हा राज्याचा प्रमुख असेल. तो देवाचा लाडका व देवाचा कृपालाभ झालेला असला तरी तो केवळ एक मानव आहे. असे समजले जात असे. (प्राचीन भारताचा राजकीय इतिहास, हेमचंद्र रॉय चौधरी, (अनुवाद डॉ. सदाशिव आठवले, मधुसुदन बोपर्डीकर) डायमंड पब्लीकेशन पुणे, २००६, पेज. नं. २६७)**राजा** हा देवाचा प्रतिनिधी आहे हा विचार सम्राट अशोकाच्या 'देवनामप्रिय, प्रियदर्षी' या बिरूदावरून स्पष्ट होतो. राजा सर्वसत्ताधिश, सर्व अधिकाराचा उद्गाता, सर्वोच्च न्यायाधिश, सर्वश्रेष्ट प्रशासनप्रमुख आहे. या नात्याने त्याला शासकीय, सैनिक विषयक व न्यायविषयक कर्तव्ये पार पाडावी लागत असे. अधिकाऱ्याची नियुक्ती, आर्थिक व्यवहारावर नियत्रंण ठेवणे. तसेच तो सर्वोच्च सेनापती असल्यामुळे युध्दप्रसंगी प्रत्यक्ष युध्दभुमीवर उपस्थित राहून युध्दाचे संचालन करणे व राज्याचे रक्षण करणे ही राजाची जबाबदारी होती. न्यायदानाचे कार्य करण्यासाठी स्वतंत्र न्यायाधिशाची नियुक्ती करण्यात येत असली तरी सर्वोच्च व अंतिम न्यायाधीश राजा हाच होता. या सर्व जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी केंद्रीय प्रशासन व्यवस्था निर्माण केल्या गेली होती.

ब) **मंत्री:—**राजाच्या मदतीकरीता मंत्री होते जे राजाला वेळोवेळी मदत करीत. प्रमुख मंत्री कौटील्य होता.मंत्रीमंडळाच्या सल्यानुसार राजा काम करीत होता तरी मंत्र्याचा सल्ला त्याला बधंनकारक नव्हता. मंत्री परिषदेच्या सदस्यांची संख्या निश्चित नव्हती. (अशोक और मोर्य साम्राज्य का पतन, रोमीला थापर, ग्रंथशिल्पी, (इंडीया) प्रायव्हेट लि. दिल्ली, १९७७, पेज नं. ९६)

क)**सचिवालय:—** राज्यकारभार निट चालविण्याकरिता सचिवालय होते ज्या अंतर्गत विविध खाती होती.

ड) **मुलकी सेवा** :— मौर्य काळात 'अमात्य' नावाचे अधिकारी असत जे आधुनिक शासन यंत्रणेप्रमाणे देशातील प्रशासन व न्याय याकडे लक्ष देत.

**२) प्रांतीय शासन:—**

मौर्य साम्राज्य विशाल असल्याने राज्यकारभाराच्या सोयीकरिता त्याची विभागणी ६ भागात अथवा प्रांतात केल्याचा उल्लेख अशोकाच्या राज्यव्यवस्थेत सापडतो ज्याचा कारभार बहुतांशी राजघराण्यातील व्यक्ती अथवा राजकुमाराकडे असायचा त्याच्या मदती करीता 'महामात्र' नावाचे अधिकारी होते.

१) गृहराज्य— राजधानी पाटलीपुत्र

२) उत्तरापथ —राजधानी तक्षशिला ( पंजाब,सिमानत प्रवेश,सिंध)

३) सेल्युकसजित प्रदेश — राजधानी कपिशा

४) सुराष्ट्र — राजधानी जुनागढ

५) अवंतीराष्ट्र — राजधानी उज्जयीनी

६) दक्षिणापथ — राजधानी सुवर्णगीरा

प्रांताचे जिल्हा, नगर, ग्राम असे विभाग करण्यात आले होते. यासाठी अधिकारी वर्ग नियुक्त केला जात असे. जिल्हा व ग्राम यामध्ये कार्यसमन्वयासाठी 'गोप' नावाचा अधिकारी असे.

**स्थानीक शासन :—**

**स्थानीक शासन** दोन भागात विभाजित होते.

१) नगर शासन.२) ग्राम शासन

**१) नगर शासन**

कौटील्याच्या अर्थशास्त्रात नगर शासनाचा उल्लेख मिळतो नगर प्रशासनाची व्यवस्था आजच्या मोठया नगरासारखीच होती. प्रत्येकी ५ सदस्य असणाऱ्या सहा समित्या असे एकूण ३० सदस्याच्या आधारे व्यवस्था सांभाळली जात होती. कर गोळा करणे, जनगणना, व्यापार, शिल्पकला यासारखी कामे विभागली होती. शाळा, दवाखाने, पाणीपुरवठा, रस्तेदुरूस्ती इत्यादी सार्वजनिक कल्याणाची कामे नगरप्रशासनाकडे होती. नगराच्या प्रमुखास 'नगरक' असे संबोधल्या जात होते.

**१) शिल्पकला समिती:**

ही समिती औद्योगिक कला निर्मितीची निरीक्षक होती.मौर्य काळात कला क्षेत्रात खूप प्रगती झाली होती असे म्हटल्या जाते की,पाटलीपुत्र येथे कलाकरांची गर्दी होती. ही समिती कलाकार,मिस्त्री,श्रमीक इत्यादीचे परिश्रीमीक त्याच बरोबर त्यांचे संरक्षण, उत्पादन शुध्दता, व उत्पादन वृध्दी याकडे लक्ष देत असे.

**२) विदेशी समिती :**

ही समिती साम्राज्यात निवास करणाऱ्या विदेशी यांकरिता होती. विदेशीचे आवागमन, संरक्षण, निवासस्थान, औषधप्रबंध व सुरक्षा इत्यादी कार्य करीत असे. इतकेच नव्हे तर विदेशींचा आकस्माक मृत्यू झाल्यास त्याच्या संपत्तीची वहिवाट त्याच्या उत्तरधिकाऱ्याकडे लावुन देण्याचे कार्य सुध्दा ही समिती करीत होती.

**३) जनसंख्या समिती :**

ही समिती केवळ जनगणना करीत नव्हती तर जन्म मृत्यू नोंदणी सुध्दा करीत होती मग तो व्यक्ती कोणत्याही कुळातील अथवा धर्माचा असो.

४)**वाणिज्य व्यवसाय समिती :**

ही समिती व्यापारी लोकावंर देखरेख ठेवीत होती. नागरीकांची मागणी लक्षात घेऊन बाजारात वस्तुंचा पुरवठा करणे कोणताही व्यापारी एकापेक्षा जास्त वस्तुचा व्यवसाय करु शकत नव्हता केल्यास त्याला आगाऊ कर द्यावा लागत असे तसेच भ्रष्टाचार व साठेबाजी करण्यावर कारवाई करीत असे.

**५वस्तु निरीक्षण समिती :**

ही समिती वस्तूचे निरीक्षण करीत असे उद्योगपतीना भेसळयुक्त वस्तु विकण्यास मनाई होती.या नियमाचा भंग केल्यास कठोर दंड दिल्या जात असे.

**६कर समिती:—**

ही समिती विक्रीत वस्तुवर कर आकारून, कर वसुल करीत असे, कर न भरल्यास कठोर दंड दिल्या जात असे.

नगर शासनाच्या प्रमुखाला अर्थशास्त्रामध्ये 'नागरिक' अथवा 'नगराध्यक्ष' म्हटल्या जात होते त्यांचे कार्य आधुनिक 'मॉजिस्ट्रेट' समान होते. त्याच्या मदती करिता 'स्थानिक' व 'गोप' नावाचे अधिकारी होते.

**रक्षीण :—**

नगर रक्षणाकरिता पोलीस असायचे ज्यांना 'रक्षीण' म्हटल्या जात होते अवैध वस्तु किंवा अवैध हत्यार बाळगण्यास मनाई होती. नगरात आग विझविण्याची संपुर्ण व्यवस्था होती. एखादया कडुन अकस्मात आग लागल्यास कठोर दंड तर जाणुन बाजून आग लावल्यास त्याला आगीत जाळल्या जात होते.

International Journal of Advances in Engineering and Management (IJAEM)
Volume 3, Issue 2 Feb 2021, pp: 16-19 www.ijaem.net ISSN: 2395-5252

**२) ग्राम शासन**

ग्राम हा राज्यातिल सर्वात लहान प्रशासकीय घटक होता. ग्रामे स्वयंपूर्ण व स्वायत्त होती ग्रामप्रमुखाला 'ग्रामीक' अशी संज्ञा होती. ग्रामीक हा वयस्क व अनुभवी व्यक्ती असायचा त्याला वेतन मिळत नव्हते. तो स्थानिक लोंकाव्दारे निर्वाचीत असायचा त्याच्या मदतीकरिता ग्रामसभा होती ती जनकल्याणकारी कार्य करीत असे.यामुळे गावातील समस्या गावातच सोडविण्याचा प्रयत्न केला जात असे. पाच –दहा गावाच्या प्रबंधाकरिता '**गोप** ' नावाचा अधिकारी असायचा त्याच्या वर 'स्थानिक' अथवा श्समाहर्ता नावाचा अधिकारी होता.

**न्याय व्यवस्था :–**

ग्रामव्यवस्थेत एक लहान न्यायालय होते जे गावात शातंता व सुव्यवस्था राखण्याकरीता आधुनिक न्यायालया प्रमाणे कार्य करीत होते. या न्यायालयाच्या वर संग्रहक, द्रोणपद व जनपद अशी न्यायालये होती परंतु सर्वोच न्यायालय 'स्वयंम राजा' होता त्याला खालच्या न्यायालयाने घेतलेले कोणतेही निर्णय रद्द करता येत होते.

प्रत्येक न्यायालय दोन भागात विभाजीत होते. एक व्यक्ती करिता व दुसरे व्यक्ती व राज्याकरिता ज्याना अनुकमे धर्मस्थीय (फौजदारी ) कंण्टक शोधन दिवाणी असे संबोधिले जात होते. न्यायाधिशांना व्यावहारिक माहमात्र म्हटल्या जात होते. चंद्रगुप्ताचे दंडविधान फार कठोर होते. लहान लहान गुन्हा करिता सुध्दा मोठयात मोठी शिक्षा दिल्या जात होती.परंतु अशोकाचे दंड विधान सौम्य होते.

**गुप्तचर विभाग (प्रतिवेदक ) :–**

कौटील्याने राज्यव्यवस्थेत गुप्तचराना विशेष महत्व दिले होते. हा विभाग राजाला साम्राज्यात घडवणाऱ्या प्रत्येक बारीक –सारीक गोष्टीची माहिती पुरवित असे जिला 'गुप्तचर संस्था'असे म्हटल्या जात होते. गुप्तचर खात्यात वेळप्रसंगी स्त्रिया व वेश्यांची ही मदत घेतल्या जात होती. त्याच प्रमाणे गुप्तहेर इतर राष्ट्राकडील माहिती गोळा करावयास आणि त्यांच्या हालचालीवर नजर ठेवण्यासाठी नियुक्त केले जात असे. यांनाच गुढपुरूष म्हणत असत. (विश्वहृदय सम्राट अशोक, बबन लवात्रे, प्रबुध्द भारत पुस्तकालय नागपुर, २०१५, पेज नं. ५०)

**लष्करी प्रशासन व्यवस्था :–**

नंदवशांचे साम्राज्यजिंकल्यानंतर चंद्रगुप्ताला एक विशाल सेना मिळाली या व्यतिरिक्त देश स्वरंक्षणाकरीता चंद्रगुप्ताने बहुसंख्याने सैनिक भर्ती केले होते.त्यानंतर सम्राट अशोकाच्या कारकिर्दित फार मोठया संख्येने सैन्य भरती करण्यात आली होती.या विशाल सेनेच्या देखरेखा करिता एका वेगळया विभागाची आवश्यकता होती. त्या अनुषंगाने अशोकाने लष्करी प्रशासन व्यवस्था अत्यंत कुशल पुर्वक केली होती. या सैनिक विभागात एकुन ६ समित्या होत्या. प्रत्येक समितीवर ५ सदस्य होते.

१.पैदल विभाग २.अश्वदल विभाग ३.रथसेना विभाग ४.गजसेना विभाग ५.नौसेना विभाग ६.सेना यातायात विभाग ( सहाव्या समिती विषयी मेगॅस्थानिज सांगतो की, ही समिती सेनेला संबंधित साधन सामुग्री पुरवठा करीत असे.) स्वत: राजा सेनेचे संचालन करित असे.कलिंग युदध प्रसंगी राजा असलेल्या अशोकाने सेनेचे संचालन केले होते.

अशोकाने प्रशासकीय व न्यायलयीन सत्ता राजूकांना फार मोठ्या प्रमाणात दिली होती. राजुक त्यांच्या अमंलातील शेकडो व हजारो लोकांवर सत्ता चालवित. (प्राचीन भारतातील राजकीय विचार आणि संस्था, डॉ. रामशरण शर्मा, (अनुवाद डॉ. पंढरीनाथ रानडे, डायमंड पब्लीकेशन पुणे) २००६, पेज नं. ३०२)

अशोकाने तत्वज्ञानापेक्षा प्रत्यक्ष कृतीवर, नैतिक आचरणावर जास्त भर दिला. वडीलमाणसे गुरुजन ह्यांच्याविषयी आदर ठेवावा, सर्वांविशयी प्रेम असावे, समभाव असावा, परमतसहिष्णू वृत्ती अंगी बाणवावी असा उपदेष अशोक आपल्या प्रजेला करीत असे. महत्वाची गोष्ट म्हणजे प्रजेसमोर त्याने स्वत:चेच उदाहरण घालून दिले. राजवाड्यातील सर्व विलास–सुखोपभोग, मद्य, प्राणिहत्या वगैरे बंद करण्यात आले. त्याचबरोबर अशोकाने लोककल्याणाची कामे प्राधान्याने सुरु केलीत. दवाखाने उघडणे, अन्न–छत्रालये सुरु करणे, रस्ते बांधणे इत्यादी कामे त्वरीत हाती घेण्यात आली.

अशोकाने प्रजेच्या कल्याणासाठी रस्त्याच्या दुतर्फा सावलीसाठी आंब्याची झाडे लावलीत. मनुष्यास व जनावरास उपयोगी पडतील जिथे होत नाही तिथे त्या बाहेरून आणून लावण्यात आल्या आहेत. (सम्राट अशोकचा राजधर्म आणि आर्याची मनुस्मृती ज्ञानेश्वर ढावरे, सुगावा प्रकाशन पुणे, २००२, पेज नं. ३२) प्रवाशांच्या सोयीकरिता अशोकाने जागोजागी सुंदर धर्मशाळा, पक्या सडका, पिण्याच्या पाण्याची सोय केली. पाणी पुरवठ्याच्या अनेक योजना त्याने राबविल्या, प्रत्येक मैल अंतरावर विहिरी खोदल्या. औषधाच्या दृष्टीने आवश्यक वनस्पती बोलावून त्यांच्या बागा तयार केल्या. अशोकाला मुक्या पशुबद्दल अतिशय दया वाटत असे. याकरिता त्याने पशुंचे दवाखानेसुध्दा स्थापन केले. मुक्या प्राण्यांची काळजी घेणारा हा बहुतेक पहिलाच राजा असावा. व्यक्तिच्या विचारात आमुलाग्र बदल घडून यावा अशी अशोकाची तीव्र इच्छा असल्याने तो गुन्हेगारांकडे सुध्दा उदार दृष्टीने पाहत असे. कडक शिक्षा करुन गुन्हेगार बदलणार नाहीत याची त्याला खात्री होती आणि म्हणून त्याने गुन्हेगारांना सौम्य शिक्षा दिलेल्या आपल्याला आढळतात. कठोर शिक्षा त्याने रद्द केल्या आणि फाशिची शिक्षा तर त्याने कोणालाच दिलेली आढळत नाही. नागरी व ग्रामीण जनतेबरोबरच वनात राहणाऱ्या लोकांच्या कल्याणाकडेही अशोकाचे लक्ष होते. या कारणामुळे अशोकाचा धम्मप्रसार झपाट्याने घडून आलेला आपल्याला दिसून येतो.

उपरोक्त विवेचनावरून स्पष्ट होते की, सम्राट अशोक महान विजेता, सफल शासक व कुशल संघटन कर्ता व दुरदर्शी सम्राट होता,या अतिरिक्त प्रतिभा संपन्नता , व दक्षता इत्यादी सारे गुण त्याच्यात होते आदर्श राज्य व्यवस्था केवळ कागदावर असून चालत नाही,तर राज्यकर्त्यानी ते आदर्श प्रत्यक्ष आचरणात आणणे गरजेचे आहे. ते स्वयंम अशोकाने केले होते.या सबंधी पुरावा ध्यावयाचा झाल्यास कलिंग अभिलेखात अशोक म्हणतो – ''सर्व मनुष्य माझी संतान आहे, ज्या प्रमाणे मी स्वत:च्या मुलाची उन्नती इच्छीतो त्याचप्रमाणे इतरांची सुख समृध्दी इच्छतो''अन्य ऐका ठिकाणी उल्लेख मिळतो की, ''सम्राट म्हणतो की,मी भोजन अथवा शयनागृहात का असेना, उद्यान अथवा शिकारी वर असेल तरी सुध्दा मी जनतेची समस्या ऐकिले '' आणि म्हणुनच सम्राट अशोकाला ''देवांना प्रिय प्रियदर्शी'' राजा म्हटले आहे. हे त्याच्या राज्यव्यवस्थेवरुन सिध्द होते.

**संदर्भ ग्रंथ**

१० भांडारकरडी. आर.–अशोक, एस. चन्द एण्ड कम्पनी (प्रा.)लिमिटेड नई दिल्ली, १९७४,
२० दिक्षितनी. सी.–भारताचा इतिहास, पाचवी आवृत्ती, पिंपळापूरेप्रकाशन, नागपूर,जाने. २०१०
३० डॉ. कोलालकर श. गो.–प्राचीन भारताचा राजकीय सामाजिक सांस्कृतिक इतिहासप्रथम आवृत्ती–१९९९, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

४ण सिंहरतिभानु—प्राचीन भारत का राजनैतिकएवं सांस्कृतिक इतिहासकिताब महल, इलाहाबाद१९७१
५ण आचार्य धनंजय —प्रारंभ ते १७६१ भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपुर २००८
६ण शर्मा रामशरण —प्रारंभिक भारतका आर्थिक और सामाजिक इतिहास, हिंदी विश्वविद्यालय, दिल्ली१९९३

International Journal of Advances in Engineering and Management
ISSN: 2395-5252




# IJAEM

Volume: 03 Issue: 02 DOI: 10.35629/5252

www.ijaem.net
Email id: ijaem.paper@gmail.com